## -: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :-

**क्रमांक/नापोआ/नाशिक महामॅरेथॉन स्पर्धा /अधिसुचना/२८७/२०१८. नाशिक दिनांक २९/११/२०१८.**

ज्या अर्थी, **दिनांक ०२/१२/२०१८ रोजी सकाळी ०६.०० ते ८.३० वा दरम्यान** नाशिक-त्रंबक व अेबीबी सर्कल ते सिटीसेंटर मॉल, संभाजी चौक ते मायकोसर्कल या मार्गावर लोकमत मेडीया प्रा. लि. तर्फे **''नाशिक महामॅरेथॉन स्पर्धा''** होणार असल्याने सदर मार्गावर वाहतूकीची कोंडी होवू नये व खबरदारीची उपाययोजना म्हणून वाहतूक मार्गात बदल करणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झाली आहे.

ज्या अर्थी, दिनांक ०२/१२/२०१८ रोजी नाशिक-त्रंबक व उंडवाडीरोड या मार्गावर **''नाशिक महामॅरेथॉन स्पर्धा''** होणार असल्याने सदर मार्गावर वाहतूकीची कोंडी होवू नये व खबरदारीची उपाययोजना म्हणून वाहतूक मार्गात बदल करणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी मी **लक्ष्मीकांत पाटील, पोलीस उप आयुक्त, (वाहतुक) नाशिक शहर** महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र एम.व्ही.ए - ११६/सीआर/३७/टी आर दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसूचने नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून वाहतुकीची कोंडी होवु नये म्हणुन आम जनतेच्या सोईसाठी खालील प्रमाणे निर्बंध जारी करीत आहे.

दिनांक ०२/१२/२०१८ रोजी '' **नाशिक महामॅरेथॉन स्पर्धा** '' निमीत्ताने त्रंबकरोड वरील त्रंबकेश्वरकडे जाणारा मार्ग गोल्फ क्लब मैदान, हॉटेल राजदुत ते हॉटेल संस्कृती पावेतो तसेच अेबीबी सर्कल ते सिटीसेंटर मॉल सिग्नल ते मायको सर्कल, या मार्गावरील **सकाळी ०५.०० ते ०९.३० वाजे पावेतो** वाहतुकीसाठी बंद राहिल.

**स्पर्धकांसाठी धावण्याचा मार्ग हा गोल्फ क्लब मैदान, हॉटेल राजदुत ते हॉटेल संस्कृती तसेच अेबीबी सर्कल ते सिटीसेंटर मॉल सिग्नल ते संभाजी चौक ते मायको सर्कल पावेतो रोडदुभाजक दिशेच्या डाव्या बाजुचा संपुर्ण मार्ग धावण्यासाठी खुला असेल.**

नमुद मार्गावरील जाणारी सर्व प्रकारची वाहने खालील पर्यायी मार्गाचा **सकाळी ०५:०० ते ०९.३० वा.** पावेतो वाहतुकीसाठी अवलंब करतील.

**१) नाशिककडून त्रंबककडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक व त्रंबककडुन नाशिककडे येणारी सर्व प्रकारची वाहतूक ही त्रंबक ते नाशिक या मार्गाचे रोडदुभाजकाचे डाव्या बाजुचा संपुर्ण मार्ग जाणे-येणेसाठी सर्व प्रकारचे वाहतूकीसाठी वापर करतील.**

**२) मायको सर्कल ते संभाजी चौक, सिटीसेंटर मॉल सिग्नल ते अेबीबी सिग्नल पावेतो अर्ध्यामार्गाचा सर्व प्रकारचे वाहतूकीसाठी जाणे-येण्यासाठी वापर करतील.**

**वरील सर्व प्रकारचे निर्बंध हे पोलीस सेवेतील वाहने, रूग्णवाहीका, शववाहीका व अग्निशमन दलाची वाहने यांना लागु राहणार नाही.**

वरील निर्बंध हे **दिनांक ०२/१२/२०१८ सकाळी ०५:०० ते ०९.३० वाजे पावेतो** अंमलात राहतील तसेच, वरील मार्गात व वेळे मध्ये परिस्थितीनुरुप बदल करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आले आहे.

सदरची अधिसुचना ही माझे सही व शिक्यानिशी दिनांक २९/११/२०१८ रोजी निर्गमित करीत आहे.

स्थळ :- नाशिक शहर.
दिनांक :-२९/११/२०१८

पोलीस आयुक्त नाशिक शहर

**(लक्ष्मीकांत पाटील )**
**पोलीस उप आयुक्त,(वाहतुक),नाशिक शहर**

**प्रति,**

व्यवस्थापक, येरवडा कारगृह मुद्रणालय, पुणे -०६.

२/- आपणास विनंती करण्यात येते की, सदरची अधिसुचनेची प्रसिध्दी पुढील राजपत्रात करावी.

**प्रत सस्नेह अग्रषित :-** १) आयुक्त, म.न.पा. नाशिक २) जिल्हाधिकारी, नाशिक.

प्रत :- १) प्रादेशिक परिवहन अधिकारी नाशिक. २) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी नाशिक.

प्रत. :- सर्व पो.उपा, सर्व सपोआ, सर्व प्रभारी अधि. पोठाणे/शाखा, पोलीस आयुक्तालय नाशिक शहर.